**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून, अधिवेशनात सर्व विधेयकांवर चर्चा करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची ग्वाही
- नाटो आणि संयुक्त राष्ट्र संघटनेतून अमेरिकेनं बाहेर पडण्याची वेळ आली असल्याची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे सल्लागार एलन मस्क यांची भूमिका
- हिमाचल प्रदेशात हिमवृष्टीमुळे तापमानात प्रचंड घसरण,अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान शून्याच्या खाली
- विदर्भाची तिसऱ्यांदा रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या जेतेपदाला गवसणी

  **आणि**
- चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत अखेरच्या साखळी सामन्यात भारताचं न्यूझीलंडपुढं विजयासाठी २५० धावांचं आव्हान

**<><><><><>**

महाराष्ट्र विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून सुरु होत आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या अभिभाषणानं अधिवेशनाला सुरुवात होईल.  राज्याचा आगामी वर्षाचा अर्थसंकल्प १० मार्च रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडला जाईल.

**<><><><><>**

अधिवेशनात सर्व विधेयकांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी असून विरोधी पक्षांना बोलण्याची संधी दिली जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराज हे आपलं आराध्य दैवत असून त्यांच्याविरोधात बोलणाऱ्यांविरोधात निश्चित कारवाई केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

अधिवेशनात विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्याची आपली तयारी असून बहुमताच्या जोरावर कामकाज रेटणार नाही, असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. महायुतीला विधानसभा निवडणुकीत भरघोस मतदान मिळालं असून यामुळे विरोधी पक्षनेता होऊ शकणार नाही, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. महायुती सरकारच्या मागच्या कार्यकाळात वेगानं काम केलं असून विकासाचा हा वेग या कार्यकाळात वाढेल, आणि त्याचं प्रतिबिंब या अर्थसंकल्पात दिसेल, असं शिंदे म्हणाले.

**<><><><><>**

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्र्यांनी आयोजित केलेल्या चहापानावर विरोधकांनी बहिष्कार टाकला. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात संवाद असावा, मात्र फक्त चहापानाला जाऊन संवाद होत नसतो, असं महाविकास आघाडीच्या वार्ताहर परिषदेत विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सांगितलं.

सत्ताधारी विरोधकांना सापत्न वागणूक देत आहे, विरोधी पक्षातल्या लोकांना खोट्या गुन्ह्यात अडकवत आहे, राज्यावर आठ लाख कोटी रुपयांचं कर्ज

आहे, हे सरकार शेतकरी, युवक यांच्या विरोधात आहे, अशी टीका दानवे यांनी केलं.

निवडणूका आल्या की सत्ताधाऱ्यांना पक्षांना शिवाजी महाराज, शाहू फुले आंबेडकर आठवतात, मात्र त्यांचा अवमान करणाऱ्यांना महत्वाच्या पदावर बसवायचं हे सरकारचं धोरण आहे अशी टीका काँग्रेस नेते भाई जगताप यांनी केली.

तर, केंद्रीय मंत्र्याच्या मुलीची छेड काढली जात असेल तर राज्यात दुसरं कोण सुरक्षित आहे असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी गुजरातच्या भेटीवर आहे. आज आपल्या भेटीच्या दुसऱ्या दिवशी ते जामनगर आणि सोमनाथ येथे विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले. आज सकाळी त्यांनी जामनगर जिल्ह्यातल्या वनतारा या प्राण्यांच्या संरक्षण, पुनर्वसन आणि संवर्धन केंद्राला भेट दिली. त्यांनी सोमनाथ मंदिरात पूजाही केली. त्यानंतर संध्याकाळी ते सासण गीर इथं पोहचले असून त्यांच्या अध्यक्षतेखाली सोमनाथ मंदिर ट्रस्टची बैठक होत आहे. प्रधानमंत्री या ट्रस्टचे अध्यक्ष आहेत.

प्रधानमंत्री उद्या सकाळी गीर राष्ट्रीय उद्यानात जंगल सफारी करणार आहेत. हे राष्ट्रीय उद्यान आशियाई सिंहांचे शेवटचे निवासस्थान म्हणून ओळखले जाते. या भेटीत प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सासण इथे राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची ७ वी बैठक होणार आहेत.

**<><><><><>**

देशातल्या सर्व पात्र मतदारांना वेगळा एपिक क्रमांक मिळावा, यासाठी निवडणूक आयोग काम करत आहे, अशी माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. एकाच वेळी दोन मतदारांना एकच एपिक क्रमांक दिला, तरी त्यातून बनावट मतदार तयार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असं आयोगानं स्पष्ट केलं. दोन वेगळ्या राज्यांमधल्या दोन मतदारांना एकच एपिक क्रमांक दिला गेल्याचं वृत्त काही माध्यमांमधून पसरलं असल्याच्या पार्श्वभूमीवर आयोगाने हा खुलासा केला आहे. एकच एपिक क्रमांक असला तरी या मतदारांचं नाव वेगळ्या राज्यात, वेगळ्या विधानसभा मतदारसंघात, आणि वेगवेगळ्या मतदान केंद्रावर नोंदलेलं आहे. यापूर्वी मतदार नोंदणीची प्रक्रीया विकेंद्रीत असल्याने असे क्रमांक दिले गेले असावे. मात्र यापुढं सर्व पात्र मतदारांना वेगळा एपिक क्रमांक मिळावा यासाठी काम सुरु असल्याचं आयोगाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

नाटो आणि संयुक्त राष्ट्र संघटनेतून अमेरिकेनं बाहेर पडावं या भूमिकेला अमेरिकेच्या शासकीय कार्यक्षमता विभागाचे प्रमुख आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे सल्लागार एलन मस्क यांनी पाठिंबा दिला आहे. आता नाटो आणि यूएनमधून बाहेर पडण्याची वेळ आली आहे, असं मस्क आपल्या समाजमाध्यमावरल्या पोस्टमधे म्हणाले.  संयुक्त राष्ट्राला दिला जाणारा निधी थांबवण्याचा प्रस्ताव गेल्या महिन्या सिनेटर ली यांनी ठेवला होता. या भूमिकेला मस्क यांनी पाठिंबा दिला. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी नाटोवर टीका करत नाटोतून बाहेर पडण्याचा इशारा दिला आहे.

**<><><><><>**

हिमाचल प्रदेशात झालेल्या हिमवृष्टीनंतर तापमानात प्रचंड घसरण झाली आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान शून्याच्या खाली पोहोचलं असून लाहौल स्पिती जिल्ह्यात केलांग इथे सर्वात कमी उणे ११ पूर्णांक ८ शतांश अंश सेल्सियस इतकं नोंदवण्यात आलं आहे. मनाली जिल्ह्यात आज सूर्यदर्शन झालं असलं तरी अनेक ठिकाणी धुकं पसरलं आहे. हिमवृष्टी आणि भूस्खलनामुळे चार राष्ट्रीय महामार्गांसह ४०० रस्ते बंद झाले आहेत. वीजपुरवठाही खंडित झाला असून मदत पोहोचवण्यासाठी अडथळे येत आहेत. हवामान विभागाने पुढच्या २४ तासात मुसळधार पाऊस आणि पुन्हा हिमवृष्टीचा अंदाज वर्तवला असून काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडच्या चमोली इथं मना इथं हिमस्खलनात अडकलेल्या कामगारांना वाचवण्यासाठी गेले तीन दिवस सुरू असलेलं बचाव अभियान आज संपलं. या दुर्घटनेत बेपत्ता झालेल्या चार कामगाराचा मृतदेह आज बाहेर काढण्यात आले. बाहेर काढलेल्या ५४ जणांपैकी ४६ जणांना वाचवण्यात यश आलं आहे, तर ८ जणांचा मृत्यू झाला आहे.

**<><><><><>**

विदर्भ क्रिकेट संघानं आज रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचं जेतेपद तिसऱ्यांदा आपल्या नावे केलं. नागपूर इथं विदर्भ आणि केरळ यांच्यात झालेला अंतिम सामना आज अनिर्णित राहिला. मात्र विदर्भानं पहिल्या डावात केरळवर मिळवलेल्या ३७ धावांच्या आघाडीच्या जोरावर जेतेपदाला गवसणी घातली.

आज सामन्याच्या अखेरच्या दिवशी विदर्भाच्या दुसऱ्या डावात ९ बाद ३७५ धावा झाल्या असताना, दोन्ही संघांनी सामना अनिर्णित राखण्यावर सहमती दर्शवली.

या सामन्यात पहिल्या डावात १५३, आणि दुसऱ्या डावात ७३ धावांची खेळी केलेल्या विदर्भच्या दानीश मालेवार सामनावीर ठरला..

विदर्भाच्याच हर्ष दुबे याला त्याच्या अष्टपैलू कामगिरीसाठी स्पर्धेतल्या सर्वोकृष्ट खेळाडुच्या किताबानं गौरवलं गेलं. त्यानं यंदाच्या रणजी हंगामात ६९ बळी टिपत, बिहारच्या आशुतोष अमन याचा एकाच हंगामातला सर्वाधिक ६८ बळींचा विक्रम मागे टाकला. यासोबतच त्यानं १० सामन्यांमध्ये पाच अर्धशतकांसह ४७६ धावाही काढल्या.

रणजी स्पर्धेचं जेतेपद पटकावल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी विदर्भाच्या संघाचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दुबई इथं सुरु असलेल्या अ गटातल्या सामन्यात भारतानं न्यूझीलंडसमोर विजयासाठी २५० धावांचं आव्हान ठेवलं आहे. हा या स्पर्धेतला अखेरचा साखळी सामना आहे. या सामन्यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारताची सुरुवात खराब झाली. शुभमन गील, रोहीत शर्मा आणि विराट कोहली हे आघाडीचे फलंदाज केवळ ३० धावांमध्येच माघारी परतले. त्यानंतर श्रेयस अय्यर यानं आधी अक्सर पटेल याच्यासोबत ९८ धावांची भागिदारी करत भारताचा डाव सावरला. श्रेयसनं सर्वाधिक ७९ धावा केल्या, तर अक्सर यानं ४२ आणि हार्दिक पांड्या यानं

४५ धावांचं योगदान दिलं. न्यूझीलंडच्या वतीनं मॅट हेन्री यानं भारताचे ५ गडी बाद केले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या २४ षटकात २ बाद ९२ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

मुस्लिमांचा पवित्र महिना रमजानला आजपासून प्रारंभ झाला असून, त्यानिमित्त प्रार्थना प्रवचन अशा धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. रमजान महिन्यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

रमजानचा पवित्र महिना श्रद्धा आणि भक्तीचं प्रतिक असून देशवासीयांना करुणा, दया आणि सेवा या मूल्यांची आठवण करून देतो, असं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

मानवाधिकार क्षेत्रात तंत्रविषयक आणि आर्थिक सहकार्यातून क्षमतावाढ या विषयावर आंतरराष्ट्रीय स्तरावरचा प्रशिक्षण कार्यक्रम उद्यापासून नवी दिल्लीत होणार आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि परराष्ट्रव्यवहार मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या कार्यक्रमात १४ विविध देशातले मिळून ४७ प्रतिनिधी सहभागी होणार असून तो येत्या ८ मार्चपर्यंत चालेल. मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती व्ही रामसुब्रमणियन यांच्या हस्ते उद्या कार्यक्रमाचं उद्घाटन होईल.

**<><><><><>**

फायरफ्लाय एअरोस्पेस या अमेरिकन कंपनीचं ब्लू घोस्ट नावाचं अंतराळयान आज यशस्वीरीत्या चंद्रावर उतरलं. या मानवरहित यानात १० उपकरणं बसवलेली आहेत. चंद्रावर उतरणारी फायरफ्लाय ही दुसरी खासगी कंपनी ठरली आहे.

**<><><><><>**

केंद्रीय राज्य मंत्री रक्षा खडसे यांच्या कन्येची छेड काढल्याप्रकरणी मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. जळगाव जिल्ह्यातल्या कोथळी गावात संत मुक्ताई यात्रेमधे हा प्रकार झाल्याचं खडसे यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**